**शिक्षणाधिकारी**
**माध्यमिक व तांत्रिक शिक्षण कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**जावक क्रमांक:- इओ/सले/**
दि - २७/०१/२०११.

मा.सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस ----

विषय - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६० अ
विनिर्दिष्ट माहिती प्रकटीकरण.
(Disclosure of specified information)

संदर्भ - मा.सल्लागार (कामगार) कार्यालय यांचे
पत्र क्र. सका/११५१ दि. १२/०१/२०११.

विषयांकित प्रकरणी इकडील कार्यालयाकडील माहिती खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कलम ६० (अ) (३) | माहिती |
|---|---|---|
| १) | महानगरपालिकेचा तपशिल | बी.पी.एम.सी ॲक्ट १९४९ चे कलम ६६ (२१) (४२) माध्यमिक व तांत्रिक शिक्षण हे महानगरपालिकेचे ऐच्छिक कर्त्यव्य असून पुणे महानगरपालिकेच्या ५६४ झोपडपट्टी क्षेत्र व स्थलांतरित होवून पुणे शहरात वास्तव्य असलेल्या सुमारे ३५ टक्के लोकसंख्येच्या कुटुंबातील ११ ते १८ वयोगटाच्या मुला-मुली च्या माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच तांत्रिक व व्यवसायिक शिक्षणाची मोफत व सुलभ व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी पुणे महानगरपालिकेने १९५३ पासून माध्यमिक शाळा सुरू करण्याचा निर्णय घेवून पहिली माध्यमिक शाळा नानावाडा येथे सुरू केली. त्यानंतर महानगरपालिका हद्द वाढ झोपडपट्ट्याचा विस्तार विचारात घेवून वेळोवेळी वेगवेगळ्या भागात मराठी माध्यमाच्या १६ (त्यातील ४ उच्च माध्यमिक ) उर्दु माध्यमाच्या ४ (१ उच्च माध्यमिक व तांत्रिक विद्यालय १ आणि औद्योगिक प्रशिक्षण विद्यालय १ ( आय.टी.आय) अशी एकूण २२ विद्यालये सुरू केली आहेत. पुणे महानगरपालिकेकडे श्री.छ.शि.औ.प्र.केंद्र ही औद्योगिक प्रशिक्षण देणारी महापालिकेची एकमेव संस्था विनाअनुदानित तत्वावर सुरू आहे. संस्थेचे मुख्य उद्दीष्ट प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतः च्या पायावर उभे राहून बेरोजगारीचा प्रश्न कमी करणे हा आहे. संस्थेमध्ये पुणे महानगरपालिकेच्या शाळांमधून १० वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यासाठी ७५ टक्के ज्यादा राखीव असतात त्यामुळे अगदी तळागाळातील गरीव व गरजू विद्यार्थ्यांना सहजासहजी प्रवेश मिळतो तसेच सध्या टर्नर, फिटर, इलेक्ट्रिशियन आणि मेकॅनिकल ड्राफ्स्मन असे ४ ट्रेड चालू असून १ वर्ष मुदतीचा खास महिला मुलींसाठी महाराष्ट्र शासनाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम (शिवण व कर्तन) टेलरिंग कोर्स चालविला जातो सध्या या कोर्सेसचे एकूण १५ मुली प्रशिक्षण घेत आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | | **उद्दीष्टे –** १) झोपडपट्टी क्षेत्रातील आर्थिक दृष्ट्या कमकुवत घटकांचा व शैक्षणिक दृष्ट्या वंचित राहणाऱ्या सुमारे १२,००० मुलांमुलीना माध्यमिक , उच्च माध्यमिक व तांत्रिक शिक्षणाच्या मोफत सुविधा व संधी उपलब्ध करून देणे.<br>२) आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या वापरातून दर्जेदार व परिणामकारक अध्ययन व अध्यापनाच्या सुविधा निर्माण करून दर्जेदार शिक्षणाची संकल्पना कार्यान्वीत करणे.<br>विशेष उपक्रम– १) मोफत बसपास सुविधा<br>२) इ ८ वी ते इ १२ वी मधील विद्यार्थ्याच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी (आय.आय.टी आय.पी.एस, आय.ए.एस) एन.जी.ओ बरोबर करार करणे.<br>३) स्काऊट गाईड पथक, बॅन्ड पथक, आर.एस. पी.<br>४) कला–क्रिडा, भौतिक स्पर्धा, विज्ञान भूगोल प्रदर्शन, प्रोत्साहनपर बक्षिस योजना,<br>५) प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा, ग्रंथालय<br>६) समुपदेशन – स्त्री मुक्ती संघटनेकडून माध्यमिक शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनीना समुपदेशनाबाबत शिक्षण दिले जाते त्यामुळे शाळेतील उपस्थिती वाढणे , गळतीचे प्रमाण, कमी होणे, विद्यार्थ्यामध्ये होणारे नशेचे प्रमाण कमी होणे , वाईट संगती याबाबत योग्य तो परिणाम होत आहे. |
| २) | महानगरपालिकेची कार्य पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा तिला सल्ला देण्यासाठी घटित करण्यात आलेली, कोणत्याही नावाने संबोधली जाणारी मंडळे, परिषदा, समित्या व इतर निकाय दर्शविणारे विवरणपत्र मग त्या मंडळाच्या परिषदांच्या समित्यांच्या व इतर निकायांच्या बैठकी जनतेसाठी खुल्या असोत किंवा नसोत अथवा अशा बैठकींची कार्यवृत्ते जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध असोत किंवा नसोत. | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| ३) | तिच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निर्देशिका | सोबत परिशिष्ट अ |
| ४) | महानगरपालिकेच्या कोणत्याही कामाकरिता सवलती, परवानगी किंवा प्राप्तीकरपत्र देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे तपशिल. | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| ५) | प्रत्येक तिमाहीनंतर दोन महिन्यांच्या आत, त्या तिमाहीचा लेखापरिक्षित ताळेबंद,जमा व खर्च आणि पैशाचा ओघ दर्शविणारे वित्तीय विवरणपत्रआणि वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांच्या आत, संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षित वित्तीय विवरणपत्र. | शिक्षकांच्या वेतनापोटी १०० टक्के अनुदान मिळत असते प्रतिवर्षी जिल्हा परिषदेकडून लेखापरिक्षण केले जाते. सन २००९–१० पर्यन्तचे लेखापरिक्षण झालेले आहे. यामध्ये वेतन–वेतनेत्तर याबाबींचा समावेश असतो तसेच मंत्रालयमार्फत प्रतिवर्षी मुंबई ऑडिट(लेखापरिक्षण) केले जाते. |
| ६) | महानगरपालिका पुरवत असलेल्या सर्व सेवा | इकडील कार्यालयास लागू नाही. |

| | | |
|---|---|---|
| | दर्शविणारे विवरणपत्र. | |
| ७) | सर्व योजनांचे तपशिल, प्रस्तावित खर्च, पुरविण्यात आलेल्या प्रमुख सेवांसाठी किंवा पार पाडलेल्या कामांसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च आणि संवितरित केलेल्या रक्कमांबाबतचा अहवाल | **प्रस्तावित योजना** - १) पर्यावरण - सदरची योजना अद्यापही कार्यान्वित नाही. २) पुणे म.न.पा हद्दीतील इ ५ वी ते इ १० वी तील विद्यार्थ्यांना मोफत पी.एम.पी. एम.एल सेवा यासाठी आमच्याकडे ९ कोटी ची तरतुद करण्यात आलेली आहे. सन २००९-१० पासून सदरची योजना कार्यान्वित झालेली आहे. सन २००९-१० मध्ये पुणे शहरातील ३०,३७८ विद्यार्थ्यांनी त्यांचा लाभ घेतला असून त्यापोटी र.रू ८,२२,३४,३५१/- इतकी रक्कम पी.एम.पी.एम.एल ला अदा करण्यात आलेली आहे. ३) माध्यमिक व तांत्रिक शिक्षण विभागाकडील माध्यमिक शाळांमधील इ ८ वी ते इ १२ वी मधील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी एनजीओ बरोबर करार करणे. (आय.आय.टी,आय.पी.एस, आय.ए.एस) यासाठी र.रू ५०,००,०००/- ची तरतूद करणेत आलेली आहे. ही योजना प्रस्तावित आहे. |
| ८) | महानगरपालिकेने पुरविलेल्या प्रमुख सेवांसाठीच्या किंवा पार पाडलेल्या कामांसाठीच्या अर्थसहाय्य कार्यक्रमांचा तपशिल आणि अशा कार्यक्रमांसाठीचे लाभार्थी निश्चित करण्याची रीत व निकष | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| ९) | महानगरपालिका क्षेत्राच्या विकासाठी संबंधित बृहत योजनेचा, शहर विकास योजनेचा किंवा इतर कोणत्याही योजनेचा तपशिल. | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| १०) | राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करेल असे, प्रमुख बांधकामांचे तपशिल तसेच बांधकामाचे मूल्य, पूर्ततेचा कालावधी आणि कराराचा तपशिल याबाबतची माहिती. | इकडील कार्यालयास लागू नाही. |
| ११) | महानगरपालिका निधीचा तपशिल, म्हणजेच मागील वर्षामध्ये पुढील बाबींद्वारे मिळालेले उत्पन्न.<br>अ) कर, शुल्क, उपकर आणि अधिभार , मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यातून मिळणारी फी.<br>ब) वसुल न केला गेलेला कर, शुल्क उपकरआणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन न परवानगी यातून मिळणारी फी आणि वसुली न करण्यामागची कारणे.<br>क) राज्य शासनाने वसुल केलेल्या करांचा महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेला हिस्सा आणि महानगरपालिकेला मिळालेली अनुदाने<br>ड) महानगरपालिकेला नेमून दिलेल्या किंवा तिच्याकडे सोपविलेल्या योजना, प्रकल्प व | याबाबीं व्यतिरिक्त आमचेकडे डिसेंबर अखेर जमा झालेली उत्पन्नाची माहीती खालीलप्रमाणे -<br>**१) वर्गशुल्क** - र.रू. १,३३,५४२/-<br>**२) सहामाही शुल्क** - र.रू १८,४६४/-<br>**३) प्रवेश शुल्क** - ३,९८९/-<br>**४) इतर जमा** - २१,००८/-<br>**५) शासकीय अनुदान** - १०,२०,४९,६७९/-<br>-------------------------<br>**एकूण जमा - १०,२२,२६,६७२/-**<br><br>**शासकीय अनुदान - १०,२०,४९,६७९/-**<br>सन २००९-१० पर्यन्तचे लेखापरिक्षण झालेले असून र.रू. ५,६२,१२,६९४ /- चे अनुदान येणे बाकी आहे.सदरचे अनुदान ३१ मार्च पर्यन्त मिळणे अपेक्षित आहे. |

| | | |
|---|---|---|
| | आराखडे यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दिलेली अनुदाने, त्यांचे स्वरूप आणि विनियोगाची मर्यादा.<br>इ) जनतेकडून किंवा अशासकीय अभिकरणांकडून मिळालेल्या देणग्या किंवा अंशदाने यामार्फत उभा केलेला पैसा. | |
| १२) | प्रत्येक विभागाला नियतवाटप केलेली वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूद | परिशिष्ट ब प्रमाणे (सोबत तरतुदी बाबतचा तक्ता जोडला आहे.) |
| १३) | विहित करण्यात येईल अशी इतर माहिती. | - |

कळावे.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक व तांत्रिक शिक्षण
पुणे महानगरपालिका.

सोबत -
१) अ.क्र.३ (परिशिष्ट अ तक्ता)
२) अ.क्र. १२ (परिशिष्ट ब तक्ता)

# मा.शिक्षणाधिकारी यांच्या
# किरकोळ रजा मिळणेबाबत.